# नागपूर महानगरपालिका, नागपूर.

## आसीनगर क्षेत्रीय कार्यालय क्र. 9

**नमूना 'अ'**

**(स्थायी आदेश क्र. द ३ (अ) पहा)**

# जाहिर लिलाव

ज्या अर्थी आसीनगर झोन क्र. 09, च्या क्षेत्रिय कार्यालयाच्या नियंत्रणातील मालमत्ता कर निर्धारण वार्ड क्र. 43, 54, 55, 56, 57 या परिसरातील मालमत्ता धारकांनी वर्ष 1998 ते दिनांक 2017 या कालावधीचा नागपूर महानगरपालिकेच्या मालमत्ता कराची थकबाकी अदा केले नाही.

आणि ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 च्या अनुसूचित ड प्रकरण 8 च्या नियम नं. 45 पोटनियम (1) अन्वये खालील तक्त्यात नमूद मालमत्ता कराच्या थकबाकी वसुलीसाठी जप्त करण्यात आल्या आहेत.

त्याअर्थी या जाहिरनाम्याद्वारे जाहीर करण्यात येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमच्या कलम 128 पोटकलम 4 च्या तरतुदीनुसार मा. आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर हे **दि. 11/12/2017 रोजी सकाळी 11:30 या वेळेत, आसीनगर क्षेत्रीय कार्यालय क्र. 9 या ठिकाणी** सोबत संलग्न पुढील परिशिष्टात नमूद केलेल्या शर्तीवर खाली नमूद केलेल्या मालमत्तेवरील हक्क, हितसंबध आणि मालकी यांची जाहिर लिलावाने विक्री करतील.

**स्थावर मालमत्तेचे विवरणः—**

| अनु. क्र. | वार्ड क्र. | मिळकतदार/मालमत्ता कर थकबाकीदारांचे नाव (गृहनिर्माण सह.सं. विकासक किंवा व्यक्ती) | प्लॉट नं. | मनपा घर क्र. | शिट क्र. /सिटीसर्वे क्रमांक | मौजा/ खसरा नं. | मालमत्ता कर थकबाकी रक्कम (इतर शुल्क वगळून) | स्थावर मालमत्तेची चर्तुःसिमा | विक्री करावयाच्या मालमत्तेचे मुल्य निर्धारण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | खुल्या जागेचे/घराचे क्षेत्रफळ चौ.मी. | खुल्या जागेचे घराचे मुल्यांकन दर प्रती चौ.मी. सिध्द शिघ्र गणक वर्ष 2017—2018 नुसार (रुपये) | खुल्या जागेचे घराचे सिध्द शिघ्र गणक वर्ष 2017—18 नुसार निर्धारित बाजार मुल्य |
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** | **9** | **10** | **11** | **12** |
| 1 | 43 | श्री. राजेन्द्र शंकर मेंढे, राणी दुर्गावती चौक, नागपूर | 23 | 1237/डी/23 | — | 21 | 81,318 | पुर्व—रोड पश्चिम—घर उत्तर—घर दक्षिण—घर | घर 65 चौ.मी. | 37,000 | 24,05,000 |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 43 | मो. अब्दुल रहिम मो. अब्दुल दयाल, निजामुद्दीन कॉलोनी, ईटा भट्टी चौक, जुना कामठी रोड, नागपूर | 135 | 2292/ए/135 | शिट क्र. –851/36 सिटी सर्वे क्र. 105 | वांजरी 52/1, 52/4 | 2,39,018 | पुर्व –15 मी रोड<br>पश्चिम–136.137<br>उत्तर–9 मी रोड<br>दक्षिण–124, 125, 126 | NR 1260 m2 | 46,100 | 5,80,86,000 |
| 3 | 43 | श्री. हरीष अहुजा, जयप्रकाश सोसायटी, मोहम्मद रफी चौक, यादव नगर, ईतवारी रेल्वे स्टेशन रोड, नागपूर | 16+27/44 | 1559/ई/16 ते 27/44 | 408/33 112 | वांजरी 43 | 87,251 | पुर्व – रोड<br>पश्चिम–दुकान<br>उत्तर–कुलदिपसिंग<br>दक्षिण–कमरसिंग | NR 31.92 m2 | 46,100 | 14,71,512 |
| 4 | 43 | श्री. धनराज मुलतानी, जयप्रकाश सोसायटी, मोहम्मद रफी चौक, यादव नगर, ईतवारी रेल्वे स्टेशन रोड, नागपूर | 16+27/27 | 1559/ई/16 ते 27/27 | 408/33 112 | वांजरी 43 | 87,251 | पुर्व – रोड<br>पश्चिम–दुकान<br>उत्तर–मुलतानी<br>दक्षिण–खान | NR 31.92 m2 | 46,100 | 14,71,512 |
| 5 | 43 | लखबिर सिंग अवतारसिंग मोहनसिंग सुरजीतसिंग सरदार सिंग भर सितवन सरदारसिंग, देवी नगर, टेका, नागपूर | 1506 | 1506 | 285 10 | बिनाखी 2/9 | 61,147 | पुर्व – प्लॉट नं. 19<br>पश्चिम– प्लॉट नं. 17<br>उत्तर–प्लॉट 7<br>दक्षिण–30मी रोड | 139.35 m2 | 26,800 | 37,34,580 |
| 6 | 43 | श्री. गुरुनाम सिंग सतनामसिंग माखन सिंग सुखदेव सिंग दिवान सिंग भींडर, बाबा बुध्दाजी नगर, म.न.पा. शाळेजवळ, नागपूर | 207 | 1543/ए/207 | 180 | बिनाकी 1/4, 4/3, 1/5, 7/1, 2/2 | 74,858 | पुर्व – प्लॉट नं. 207/बी<br>पश्चिम– मेडीकल दुकान<br>उत्तर–रोड<br>दक्षिण–प्लॉट नं. 201 | 68.80 sqm | 26,800 | 18,43,840 |
| 7 | 43 | मे. हितेश बिल्डर्स ॲन्ड एफ/ओ., श्री. सत्यनारायण दास कंगवानी, ईतवारी रेल्वे स्टेशन रोड, जयभिम चौक, नागपूर | 253 | 1559/ई 253/3 | – | बिनाकी | 74,242 | पुर्व – रोड<br>पश्चिम– प्लॉट नं. 256, 257<br>उत्तर–प्लॉट 252<br>दक्षिण– प्लॉट 259 | 27.00 sqm | 46,100 | 12,44,700 |
| 8 | 54 | श्री. अमर कौर कोहली, सरदार सिंग कोहली आणि तेजपाल कौर सरदार सिंग कोहली, काश्मीर गल्ली, एच.डी.एफ.सी. बँकच्या बाजुला, शेवटचा बंगला, नागपूर | 629 | 23 | सिट क्र. 287 सिटी सर्वे नं. 2286 | इंदोरा | 3,80,945 | पुर्व–कश्मिरी अपार्टमेंट<br>पश्चिम–अमरनानी<br>उत्तर– कुंगवानी<br>दक्षिण– एम.एस. मशीन | GF=120.77<br>FF=120.77<br>SF=63.35 | 28,000 | 85,36,920 |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 57 | सौ. सुषमा राजेश पोरवाल, नारी टेलीफोन एक्सचेंज च्या आधी इंडस्ट्रीज एरीया, बर्फ कंपनीवाला, नागपूर | 84 | 2159/84 | सिट क्र. 414/100 ॲण्ड 417/91 सिटी सर्वे नं. 457 | मौजा–नारी खसरा नं. 163 | 3,83,102 | पुर्व–रोड<br>पश्चिम–प्लॉट नं. 83<br>उत्तर– रोड<br>दक्षिण– प्लॉट नं. 62 | GF=169.24 | 33,400 | 56,52,616 |
| | | | | | | | | | SF=169.24 | 33,400 | 56,52,616 |
| | | | | | | | | | TF=108.46 | 33,400 | 36,22,564 |
| | | | | | | | | | GF/NR=225.10 | 51,500 | 1,15,92,650 |
| | | | | | | | | | Basement GF./NR = 129.10 | 51,500 | 66,48,650 |
| | | | | | | | | | | **Total** | **3,31,69,096** |
| 10 | 57 | दिपक नर्मदाप्रसाद यादव, बंधु गृहनिर्माण सह.संस्था, दिपक नगर, रिंग रोड, नागपूर | 10 | 2172/10 | – | मौजा–नारी खसरा नं. 80 | 3,40,821 | पुर्व–दुकान<br>पश्चिम–रोड<br>उत्तर–रोड<br>दक्षिण– रोड | GF=61.38 | 25,000 | 15,34,500 |
| | | | | | | | | | FF=61.38 | 25,000 | 15,34,500 |
| | | | | | | | | | NR=78.50 | 36,700 | 28,80,950 |
| | | | | | | | | | | **Total** | **59,49,950** |
| 11 | 57 | श्री. दिलीप रामदास मेश्राम, स्मॉल स्केल इंडस्ट्रीयल एरीया, कामठी रोड, नारी, नागपूर | 2 | 2246/बी/2 | – | मौजा–नारी खसरा नं. 69, 70,71,153 /2, 154/1 153/1 | 1,47,703 | पुर्व–प्लॉट 3<br>पश्चिम–प्लॉट 1<br>उत्तर– रोड<br>दक्षिण– प्लॉट 30 | NR 27.00m2 | 51,500 | 13,90,500 |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 12 | 57 | मे. काळे लेड–डेव्ह. ह.खरी, पुष्पा केवलराम हरीयानी, प्लॉट नं. 13, नारा रोड, एच.पी. गॅस गोडावून जवळ, नारा रोड, नागपूर | 13 | 3092/बी/13 | – | नारा 171/2, 172/2, 175/2, 173, 174 | 1,15,039 | पुर्व–प्लॉट नं. 13<br>पश्चिम–रोड<br>उत्तर– खसरा 168 ची जागा<br>दक्षिण– प्लॉट नं. 2 | NR GF-151.10 m2 | 35,900 | 54,24,490 |
| | | | | | | | | | R FF-27.91m2 | 22,600 | 6,30,766 |
| | | | | | | | | | | **Total** | **60,55,256** |
| | | **एकूण** | | | | | **20,72,695** | | | **Total** | **12,53,58,866** |

## जाहीर लिलावाचे अटी व शर्तीचे परिशिष्ट

1. विक्रीचे वेळ.
   विक्रीचा जाहिरनामा प्रसिध्द केलेल्या तारखेपासून 15 दिवसांची मुदत संपेपर्यंत कोणतीही स्थावर मालमत्तेची विक्री करता येणार नाही.
2. विक्री :–
   प्रत्येक स्थावर मालमत्तेची विक्री आयुक्तांनी त्याबाबतीत प्राधिकृत केलेल्या अधिकारी करील व अशी विक्री जाहिर लिलावाने केली जाईल.
3. विक्री संबंधी इतर अटी :–
   विक्री संबंधी या आदेशात वा इरतत्र उवधुत न केलेल्या जाहीर लिलावाच्या पुर्वी किंवा नंतर वापरण्याच्या कार्यपध्दतीत संबंधीच्या अटी आयुक्त विहीत करु शकतील, अशा अटी या स्थाई आदेशाचाच भाग समजण्यात येतील.

4. विक्री तहकूब करणे :–
   कसूरदाराने किंवा त्यांच्या वतीने कोणी दुसऱ्या व्यक्तीने थकबाकीची रक्क्म जाहिरनाम्यातील मालमत्तेची विक्री करण्याच्या वेळेपुर्वी केव्हाही अदा केल्यास वा थकबाकीचे पैसे भरल्यास महानगरपालिकेतील अधिकाऱ्याकडील पावती वा प्रमाणपत्र सादर केल्यास सदर मालमत्तेची विक्री तहकूब केली जाईल.
5. विक्री लांबणीवर टाकणे.
   विक्री लांबणीवर टाकणेबाबत.
   अ. आयुक्त किंवा विक्री करण्यास प्राधिकृत केलेली अधिकारी योग्य कारणासाठी विक्री लांबणीवर टाकू शकेल. मात्र अशा कारणाची लेखी नोंद ठेवावी लागेल.

ब. कोणत्याही खरेदीदाराची थकबाकीची रक्कम व विक्रीचा खर्च या पेक्षा कमी रक्कमेची बोली नाकारण्यात येईल व फेरविक्री संबंधी नवीन जाहिरनामा प्रसिध्द करण्यात येईल.

क. ज्या प्रकरणात विक्री लांबणीवर टाकण्यात आली असेल अशा प्रत्येक प्रकरणी फेरविक्री संबंधी नवीन जाहीरनामा प्रसिध्द करण्यात येईल.

6. कसूरदाराना रक्कम उभी करण्यासाठी गहाण वगैरे ठेवून संधी देण्यासाठी विक्री लांबणीवर टाकणेबाबत.

अ. स्थावर मालमत्ता विक्री काढण्याचा जाहिरनामा काढल्यानंतर जर कसूरदाराने ती किंवा इतर मालमत्ता गहाणवट टाकून भाड्याने देवून किंवा अशा मालमत्तेची किंवा त्यातील काही भागाची विक्री करुन किंवा इतर मालमत्तेची विक्री करुन पैसा उभा करणार असल्याबद्दल आयुक्तांची खात्री पटवून दिली व तशा प्रकारे अर्ज दिल्यास त्याची पडताळणी करुन आयुक्त कसूरदाराला पैसे उभे करण्यासाठी अशा मालमत्तेची विक्री काही कालावधी करीता स्थगित ठेवू शकतील. यासाठी अटी व शर्ती विहीत करण्यास आयुक्त सक्षम असतील.

ब. अशा प्रकरणात आयुक्त कसूरदाराला नियोजित गहाणवट, भुईभाडे पोटी किंवा मालमत्तेची विक्री करुन वगैरे बाबतीत लेखी परवानगी देतील व येणे असलेली रक्कम विहित मुदतीच्या आत भरणा करण्यास परवानगी देतील.

अशा प्रकारे करण्यात आलेली गहाणवट विक्री वा भाड्याने देण्याचे कृत्य या स्थायी आदेशान्वये जोपर्यंत आयुक्त त्यास परवानगी देणार नाहीत तोपर्यंत हा व्यवहार अंतिम झाला असे समजण्यास येणार नाही.

7. खरेदीदाराने भरावयाची अनामत आणि न भरल्यास पुर्नविक्री :–

अ. मालमत्ता विक्रीच्या वेळी ज्या खरेदीदाराची बोली स्विकारली जाईल त्याने खरेदीच्या किमंतीपैकी 25 टक्के रक्कम लिलाव करणाऱ्या अधिकाऱ्याकडे तात्काळ भरली पाहिजे अन्यथा ही मिळकत ताबडतोब परत विक्रीसाठी काढण्यात येवून तिची विक्री केली जाईल आणि पूर्वीच्या खरेदीदारास पुन्हा लिलावात भाग घेता येणार नाही.

ब. जेव्हा नियम 47 (7) प्रमाणे आयुक्त स्वतः खरेदीदार असेल तेव्हा त्यास या स्थायी आदेशातील अटी लागू असणार नाहीत.

8. खरेदीची संपूर्ण रक्कम भरण्यासाठी मुदत.

स्थायी आदेश क्र. 16 व 17 मध्ये नमूद केलेली 20 दिवसांची मुदत संपल्यानंतर 7 दिवसांचेआत अथवा 7 वा दिवसा रविवार किंवा सुट्टीचा असेल तर त्या नंतरच्या लगतच्या कामाच्या दिवशी खरेदीदार खरेदीची उर्वरित रक्कत महानगरपालिकेच्या कार्यालयात भरील.

9. खरेदीची रक्कम भरण्यास कसूर केल्यास त्याचे परिणाम.

वरील स्थायी आदेशामध्ये नमूद केलेल्या कालावधीमध्ये खरेदीची उर्वरित रक्कम जमा करण्यास खरेदीदाराने कसूर केल्यास त्याने लिलावाचे वेळी जमा केलेल्या अनामत 25 टक्के रक्कमेतून विक्रीसाठी झालेला खर्च भागविण्यात येईल आणि उर्वरित रक्कम महानगर पालिकेच्या निधीत जमा करण्यात येईल. त्यानंतर सदर मिळकतीची पुर्नविक्री करण्यात येईल. कसूरदार असलेल्या खरेदीदाराला मिळकतीवर अथवा मिळकतीची विक्री करुन मिळालेल्या रक्कमेच्या कोणत्याही भागावर हक्क राहणार नाही.

10. पुर्नविक्री अथवा नुकसान झाल्यास खरेदीदारांवरील दायित्व.

अशा प्रकारे केलेल्या पुर्नविक्रीमध्ये पूर्वीच्या खरेदीदाराने दिलेल्या बोलीपेक्षा कमी किमंत आल्यास सदर दोन किमतीमधील फरक आणि पुर्नविक्रीसाठी झालेला सर्व खर्च पूर्वीच्या खरेदीदाराकडून मिळकत करावी थकबाकी समजून वसूल केला जाईल.

11. विक्री रद्बादल करण्यासाठी अर्ज करणे.

अ. जेव्हा या स्थायी आदेशानुसार स्थावर विक्री केली जाईल ते दिवसानंतर 20 दिवसाचे आत सदर मिळकतीचा मालक अथवा सदर मिळकतीच्या विक्रीपूर्वी सदर मिळकतीमध्ये कोणतेही हितसंबंधी असलेला व्यक्तीने सदर विक्री रद्बादल ठरविण्यासाठी अर्ज करु शकेल मात्र त्यापूर्वी खालीलप्रमाणे रक्कम महानगरपालिकेच्या कार्यालयात जमा करावी लागेल.

1. खरेदीदाराला देण्यासाठी खरेदी किमंतचे 5 टक्के रक्कम.
2. त्यासाठी लिलावाने विक्री करण्याचे आदेश झाले होते ती जाहिरनाम्यात नमूद केलेली परंतु महानगरपालिकेत जमा केलेली रक्कम लिलावाच्या जाहिरनाम्यानंतर वजा जाता उरलेली रक्कम.

ब. एखाद्या व्यक्तीने स्थायी आदेश क्र. 17 अन्वये विक्री रद्बादल ठरविण्यासाठी अर्ज मागे घेतल्याशिवाय या स्थायी आदेशाखालील अर्ज करण्याचा अथवा तक्रार दाखल करण्याचा तिला हक्क असणार नाही.

क. लिलावाच्या जाहिरनाम्यात उल्लेख नसलेल्या खर्चाची वा व्याजाची रक्कम देण्याची जबाबदारी कसूरदारावरच राहते.

12. फसवणूक अथवा अनियमितपणा यावरुन विक्री रद्दबातल ठरविण्यासाठी करावयाचा अर्ज.

लिलावाच्या तारखेनंतर 20 दिवसाचे आत कोणतीही व्यक्ती स्वतःच्या हितसंबंध अशा विक्रीमुळे बाधा पोहचली आहे वा लिलावाच्या प्रसिध्दीमध्ये अथवा लिलावाने विक्री करण्यामध्ये फसवणूक अनियमितपणा अथवा चूक केली वा झाली आहे या कारणावरच रद्दबातल ठरविण्यासाठी अर्ज करु शकेल.

मात्र आयुक्तांची अशा फसवणूकीमुळे अनियमितपणामुळे अथवा चुकीमुळे अर्जदाराच्या हितास कशाप्रकारे बाधा पोहचत आहे व त्यामुळे त्याचे काय नुकसान होत आहे. याबद्दल अर्जदाराने आयुक्तांची खात्री पटवून देणे आवश्यक राहील.

13. विक्री रद्दबादल ठरविण्याचे आयुक्तांचे अधिकार.

आयुक्तास स्वतःचे अधिकारात आवश्यक ती कारणे लेखी नोंदवून लिलाव विक्री रद्द करता येईल. मला अशी विक्री रद्दबादल ठरविण्यासाठी त्यांचेकडे अर्ज केलेल्या असो अथवा नसो.

14. विक्री केव्हा कायम किंवा रद्दबादल ठरविली जाईल.

अ. स्थायी आदेश क्र. 16 व 17 खाली कोणताही अर्ज केलेला नसेल किंवा असा केलेला अर्ज नामंजूर केल्यावर आयुक्त अशी विक्री कायम करण्यात आल्याचे आदेश जारी करतील आणि त्यानंतर ती विक्री कायम व अबाधित समजण्यात येईल.

ब. जेव्हा असा अर्ज मंजूर केला जाईल किंवा स्थायी आदेश क्रमांक 16 खाली केलेल्या अर्जाचे प्रकरणी स्थायी आदेशामध्ये नमूद केलेल्या 20 दिवसांचे मुदतीत आवश्यक रक्कम भरण्यात आलेली असेल तर आयुक्त अशी विक्री रद्दबादल ठरविल्याचे आदेश करतील.

मात्र असे आदेश काढण्यापुर्वी असा अर्ज केल्यामुळे ज्या व्यक्तीस बाधा पोहचणार असेल त्यांना त्याबाबत नोटीस देणे आवश्यक आहे.

15. काही प्रकरणात खरेदीची किंमत परत करणे.
जेव्हा स्थायी आदेश क्रमांक 19 अन्वये विक्री रद्दबादल ठरविण्यात आलेली असेल तेव्हा खरेदीदारास त्याने भरलेली खरेदीची रक्कम परत मिळण्याचा अधिकार असेल.

16. मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क खरेदीदाराणे भरणे बाबत.
“वर निर्देशिलेल्या प्रमाणपत्रा बाबतचे मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क इत्यादी सर्व खर्च खरेदीदारासच भरावे लागेल.”

17. खरेदीदाराचे मिळकतीवरील मालकी हक्क.
जेव्हा या स्थायी आदेशाखाली मिळकतीची विक्री करण्यात येईल आणि अशी विक्री परिपूर्ण कायम करण्यात आलेली असेल तेव्हा अशी मिळकत तिची विक्री झाल्यापासून खरेदीदाराच्या मालकीची झाल्याचे समजण्यात येईल.

18. विक्रीतून मिळालेल्या रक्कमेचा विनियोग.
जेव्हा लिलाव व विक्री पूर्ण होईल तेव्हा अशा विक्रीपासून मिळालेल्या रक्कमेतून प्रथम विक्रीसाठी झालेली खर्चाची रक्कम व त्यानंतर थकबाकीची रक्कम वळती करुन उर्वरित रक्कम थकबाकीदाराचे नावे महानगरपालिकेच्या फंडामध्ये जमा करण्यात येईल.

19. अधिनियमाच्या अनुसूचिमधील नियम.
अधिनियमातील ड अनुसूचीच्या प्रकरण आठ मधील स्थावर मिळकतीचे विक्रीसाठी लागू असलेले नियम आवश्यक त्या फेरबदलासह (mutatis mutandis) लागू राहतील.

| | | |
|---|---|---|
| सहाय्यक आयुक्त<br>आसीनगर झोन क्र. 9 | सहाय्यक अधिक्षक<br>आसीनगर झोन क्र. 9 | राजस्व निरीक्षक<br>आसीनगर झोन क्र. 9 |

डाऊनलोड केलेले

(12)

" श्री. दिलीप रामदास मेश्राम "




... क्र. 12

... ऊनलोड केलेल ...

(12)

" श्री. दिलीप रामदास मेश्राम "



... /८/२ ... क्र. 12 ...

डॉऊनलोड केलेले नागरिकाचा

(11)

" दिपक नर्मदाप्रसाद यादव, बन्धु गृहनिर्माण सह. संस्था नागपुर "



डॉऊनलोड केलेले नागरिकाचा ...


(11)

"दिपक नर्मदाप्रसाद यादव, लघु गृहनिर्माण सह. संस्था नागपूर"



(10)

"सौ. सुषमा राजेश पोरवाल."



…/84 जाहिरनामा अ.क्र. 10

(8)

" श्री. अमर कौर कोहली, सरदार सिंग कोहली आणि तेजपाल कौर सरदार सिंग कोहली. "



7

"मे. हितेश बिल्डर्स
ॲन्ड एफ / प्रो.
श्री. सत्यनारायण
पवन कंगवानी"






(6)

"श्री गुरुनाम सिंग रतनामसिंग मखन सिंग खुशदेव सिंग दिवान सिंग भाटि"

जाहिरनामा अ.क्र. 6



(5)

" करणसिंग सिंग, लखबीरसिंग, मोहनसिंग, गुरमीतसिंग करतार सिंग, भर रितवन करतारसिंग "

open plot

(5)




(4) "श्री धनराजु मुलतानी"

1559/E/16 TO 27/27 जाहिरनामा अ.क्र. 4

" श्री हरीश अहूजा "

(3)




(3)

(२)

" मो. अब्दुल वहिम मो. अब्दुल पयाल "



(1)

"श्री. राजेंद्र शंकर मोरे"



(९)

" श्री. अमर कौर कोहली, सरदार सिंग कोहली आणि तेजपाल कौर सरदार सिंग कोहली. "



(९)